**प्रेसनोट**

# “अंमली पदार्थ विरोधी पथकाची कारवाई, तरुणांकडुन गांजाचा साठा जप्त”

२६ जुन हा दिवस ‘आंतराष्ट्रीय अंमली पदार्थ विरोधी दिवस’ साजरा होणार असल्याने, त्या अनुषंगाने मा. अपर पोलीस आयुक्त श्री. अशोक मोराळे यांनी पुणे शहरातील अंमली पदार्थ विक्री करणारे, वाहतुक करणारे, साठा करणारे, यांचा शोध घेवुन कडक कारवाई करणे बाबत गुन्हे शाखेचे अंमली पदार्थ विरोधी पथकास आदेश दिले आहेत.

त्या अनुषंगाने श्री. शिरीष सरदेशपांडे, पोलीस उप आयुक्त, गुन्हे यांचे मार्गदर्शना खाली मा. सहाय्यक पोलीस आयुक्त, समीर शेख, सहाय्यक पोलीस आयुक्त, भानुप्रताप बर्गे, यांनी दिलेल्या सुचनांनुसार दिनांक २१/०६/२०१९ रोजी अंमली पदार्थ विरोधी पथकाचे पोलीस निरीक्षक राजेंद्र मोहिते हे स्टाफसह स्वारगेट/ खडक पोलीस ठाणेचे कार्यक्षेत्रात पेट्रोलिंग करीत असताना, सहाय्यक पोलीस निरीक्षक बापु रायकर व पोलीस नाईक मनोज साळुंके यांना बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, “व्हेगा सेंटर समोर, शंकरशेठ रोडवर दोन इसम गांजा घेवुन येणार आहेत” त्याप्रमाणे मिळालेल्या बातमी प्रमाणे इसम नामे ०१) सुरेश धनराज राठोड, वय- २१ वर्षे, रा. पोस्ट-ढोलानायकतांडा, जि. संगारेड्डी, ता. नागलगिध्धा, राज्य-तेलंगणा २) देविसिंग बद्दुसिंग राठोड, वय – २९ वर्षे, रा. पोस्ट- माविनेल्ली, ढोलानायकतांडा, जिल्हा संगारेड्डी राज्य-तेलंगणा या तरुणांना शिताफिने पकडुन त्यांचे ताब्यातुन किंमत रुपये ३,३२,७९०/- किंमतीचा १६ किलो ३६२ ग्रॅम गांजा हा अंमली पदार्थ जप्त करण्यात आला असुन, त्यांना अटक करण्यात आली आहे. सदर बाबत पोलीस उप निरीक्षक सुभाष तागड यांनी दिलेल्या फिर्यादी अन्वये आरोपीतांना अटक करण्यात आले आहे. पुढील तपास खडक पोलीस ठाणे करीत आहे.

सदरची कारवाई मा. श्री.अशोक मोराळे, अपर पोलीस आयुक्त,गुन्हे यांचे आदेशा प्रमाणे श्री. शिरीष सरदेशपांडे, पोलीस उप आयुक्त, गुन्हे, सहाय्यक पोलीस आयुक्त समीर शेख, सहाय्यक पोलीस आयुक्त भानुप्रताप बर्गे यांचे मार्गदर्शनाखाली अंमली पदार्थ विरोधी पथकाचे पोलीस निरीक्षक राजेंद्र मोहिते, सहाय्यक पोलीस निरीक्षक बापु रायकर, पोलीस उप निरीक्षक सुभाष तागड, सहाय्यक पोलीस उप-निरीक्षक दिलीप जोशी, अविनाश शिंदे, प्रविण शिर्के, मोहन साळवी, अर्जुन दिवेकर, पोलीस हवालदार महेंद्र पवार, राहुल जोशी, प्रफुल्ल साबळे, शिवाजी राहिगुडे, मिना पिंजण, पोलीस नाईक मनोज साळुंके, राजु पाटील, विशाल शिंदे, हेमा ढेबे, पोलीस शिपाई सचिन चंदन, अमित छडीदार, योगेश मोहिते यांनी भाग घेतला.